| पुणे पोलीस | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | पुणे शहर वाहतुक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |
|---|---|---|

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो/ ९४७० /२०२४ दिनांक :- २८ /१२/२०२४

**प्रेसनोट**

**०१/०१/२०२५ रोजी, कोरेगाव भिमा, पेरणेफाटा,ता.हवेली जि.पुणे येथील विजयस्तंभास अभिवादन कार्यक्रमाचे अनुषंगाने दिनांक- ३१/१२/२०२४ रोजी सायं. ००.०१ वा. पासुन ते दिनांक- ०१/०१/२०२५ रोजी,रात्रौ २४.०० वा.चे दरम्यान करण्यात येणा-या वाहतूकीच्या बदलाबाबत.**

---------oo--------

पेरणेफाटा, पेरणेगाव ता.हवेली जि.पुणे येथील विजयस्तंभास अभिवादन कार्यक्रमाचे अनुषंगाने दिनांक ०१/०१/२०२५ रोजी विजयस्तंभास मानवंदना देण्यासाठी राज्यातील व परराज्यातील नागरीक,अनुयायी मोठया प्रमाणात सामील होतात. त्यामुळे पुणे- अ.नगर मार्गावरील पेरणे फाटा येथे गर्दीमुळे वाहतुक कोंडी होऊ नये व वाहतूक सुरळीत राहावी या करीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, सर्व प्रकारच्या वाहनांचे वाहतूकी संदर्भात व पार्कीग बाबत खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे. (अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ. वगळून )

## अ) पेरणे फाटा,पेरणेगांव,विजयस्तंभ येथील व परिसरालगतचे येणा-या व जाणा-या मार्गावरील वाहतूक बदल/निर्बध/नियोजन

- ❖ पुणे शहरातुन नगर रोडने खराडी बायपास - वाघोली - लोणीकंद - थेऊर फाटा- तुळापुर फाटा - भिमा कोरेगांव, पेरणे गाव (भिमा नदी ब्रीज)पुणे पोलीस आयुक्तालय हद्दी पर्यत सर्व प्रकारचे वाहनांना वाहतूकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे. (अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका पीएमपीएल बस, अनुयायी व स्थानिक नागरिक इ. वगळून )

- ❖ मरकळ नदीब्रिज - तुळापुर फाटा पर्यत सर्व प्रकारचे वाहनांना वाहतूकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे. (अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका पीएमपीएल बस,अनुयायी व स्थानिक नागरिक इ. वगळून )

- ❖ वाघोली केसनंद फाटा -केसनंद गांव-मगर वस्ती-खंडोबाचा माळ-लोणीकंद (थेऊर फाटा) पर्यत सर्व प्रकारचे वाहनांना वाहतूकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे. (अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका पीएमपीएल बस,अनुयायी व स्थानिक नागरिक इ. वगळून )

- ❖ सोलापूर रोड (थेऊर फाटा) - थेऊर गांव-कोलवडी -केसनंद गांव -मगर वस्ती -खंडोबाचा माळ-लोणीकंद (थेऊर फाटा) सर्व प्रकारचे वाहनांना वाहतूकीस प्रवेश बंद करण्यात येत आहे. (अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका पीएमपीएल बस,अनुयायी व स्थानिक नागरिक इ. वगळून )

❖ इंद्रायणी नदीवरील आळंदी-तुळापुर रोडवरील मरकळ ब्रिज हा पुल जड वाहनांना हॉईट बॅरिअर मुळे बंद करण्यात आला असल्याने सदर ठिकाणाहून केवळ अनुयायांच्या हलक्या चारचाकी वाहनांना प्रवेश दिला जाईल. अनुयायांच्या बस/टेम्पो, तत्सम वाहनांनी पुर्वीच चाकण -शिक्रापुर मार्गाचा वापर करावा.

❖ विश्रांतवाडी - लोहगांव -वाघोली व वाघोली-लोहगांव मार्ग विश्रांतवाडीकडे जाणारी सर्वप्रकारच्या वाहनांना दि ३१.१२.२०२४ ते ०१.०१.२०२५ रोजी दरम्यान बंद करण्यात येत आहे. (अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका, व स्थानिक नागरिक इ. वगळून )

**ब) पेरणे फाटा ,पेरणे गांव,विजयरस्तंभ येथे येणा-या व जाणा-या अनुयायांच्या वाहनांनी ०१.०१.२०२५ रोजी खालील मार्गाचा व पार्कीगचा वापर करावा.**

| अ. क्र | मार्ग (येणे व त्याच मार्गाने जाणे) | वाहनाचा प्रकार | पार्कींग व्यवस्था |
|---|---|---|---|
| १ | खराडी बायपास-वाघोली-थेऊर फाटा (लोणीकंद) | चारचाकी हलके वाहने | १)लोणीकंद आपले घर शेजारील पार्किंग क्र. २ व पार्कीग क्र ४<br>२)लोणीकंद बौद्ध वस्ती शेजारी पार्किंग क्र. ३<br>३)हॉटेल ओम साई लॉजच्या पाठीमागील पार्किंग क्र. ६<br>४)तुळापुर फाटा स्टफ कंपनी शेजारी पार्किंग क्र. ७ |
| | | दुचाकी वाहने | १) लोणीकंद आपले घर शेजारील पार्किंग क्र. १ व पार्कीग क्र ५ , ८ |
| २ | खराडी बायपास-वाघोली-केसनंद फाटा -केसनंद गाव-मगर वस्ती-खंडोबाचा माळ | बसेस/टेम्पो तत्सम वाहने | १) थेऊर रोड खंडोबा माळ पार्किंग क्र. १६ |
| | **टिपः- बसेस/टेम्पो व तत्सम वाहनांनी वरील मार्गानेच प्रवेश करावा.** | | |
| ३ | आपत्कालीन/ पर्यायी मार्ग. खराडी बायपास-वाघोली-बकोरी फाटा-मगर वस्ती-खंडोबाचा माळ | चारचाकी वाहने (वाहतुकीची परिस्थिती पाहून) | १) थेऊर रोड खंडोबा माळ पार्किंग क्र. १६ |
| ४ | आळंदी-मरकळ-तुळापुर फाटा वाय जंक्शन | चारचाकी हलके वाहने | १)तुळापुर रोड वाय पॉईंट समोरील पार्किंग क्र. ९<br>२)तुळापुर रोड हॉटेल गणेश मिसळचे पाठामागे पार्किंग क्र. १२<br>३)तुळापुर रोड हॉटेल चौरंग समोर पार्किंग क्र. १८<br>४)तुळापुर रोड फुलगाव सैनिकी शाळा मैदान पार्किंग क्र. १३ |
| | | दुचाकी वाहने | १)तुळापुर रोड हॉटेल शेतकरी मिसळ शेजारील पार्किंग क्र. १०<br>२) तुळापुर रोड हॉटेल निसर्ग लॉजचे शेजारी पार्किंग क्र. ११ |
| | टिपः- १) मरकळ ते तुळापुर फाटा (नगर रोड)या दरम्यानच्या रोडवर अनुयांसाठी उपलब्ध असणारी पार्कीग क्षमता भरल्यानंतर नियंत्रण कक्ष/ वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड यांनी मरकळ बाजूने येणा-या अनुयायांची वाहने उर्से टोल नाका / चाकण या ठिकाणाहून चाकण - शिक्रापुर रोडने शिक्रापुर कडे मार्गस्थ करावे. या बावत नियंत्रण कक्ष / वाहतूक विभाग पुणे शहर,पिंपरी चिंचवड,पुणे ग्रामीण हे योग्य | | |

| | |
|---|---|
| | प्रकारे समन्वयाने (Coordination) वाहतूकीचे नियोजन करतील.<br><br>२) मरकळ नदी पुलावर हाईट बॅरियर लावण्याने बस/टेम्पो व इतर तत्सम वाहने यांना मरकळ नदी पुलाचे पुढे प्रवेश बंद राहील.अशा वाहनांनी पुर्वीच चाकण ते शिक्रापुर मार्गाचा वापर करुन मार्गस्थ व्हावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | सोलापूर रोड-उरळी कांचन उजवीकडे वळून आष्टापुर फाटा - पेरणे गांव | चारचाकी/ दुचाकी वाहने | १) पेरणे गाव छत्रपती शिवाजी महाराज पुतळया जवळील समोरील मोकळे मैदान पार्किग क्र. १७ |
| ६ | सोलापूर रोड -थेऊर फाटा-थेऊर गांव-कोलवडी- केसनंद गांव-मगर वस्ती- खंडोबाचा माळ | चारचाकी हलके वाहने | १) थेऊर रोड, खंडोबाचा माळ वेअर हाऊस शेजारी पार्किग क्र १५ |
| | | बस /टेम्पो व तत्सम वाहने | २) थेऊर रोड खंडोबा माळ पार्किग क्र. १६ |
| | | दुचाकी | १) सोमवंशी ॲकॅडमी समोर थेऊर रोड पार्किग क्र. १४ |
| ७ | कोल्हापूर/सांगली/सातारा-शिरवळ -पंढरपुर फाटा-लोणंद-निरा-वाल्हे-जेजुरी-उरळी कांचन-थेऊर फाटा-केसनंद गांव-मगर वस्ती-खंडोबाचा माळ | बसेस/टेम्पो तत्सम वाहने | १) थेऊर रोड खंडोबा माळ पार्किग क्र. १६ |
| ८ | नो पार्कींग ( No Parking ) | वरील नमुद पार्कीगमध्येच अनुयायांनी आपले वाहने पार्क करावीत.वर नमुद केलेले अनुयांच्या वाहनासाठी अ. क्र १ ते ७ वरील प्रमाणे येण्याचा/जाण्याचा मार्ग नो पार्कीग म्हणुन घोषित करण्यात येत आहे तसेच येण्याच्या व जाणाच्या मार्गावर / रोडवर दोन्ही बाजुस वाहने पार्क करु नयेत. | |

**क)** अनुयायांचे <u>वाहना व्यतिरीक्त</u> इतर (हलके) वाहनाकरीता पर्यायी मार्गे

| अ. क्र | मार्गे | जाण्याचा पर्यायी मार्गे (हलके वाहने) |
|---|---|---|
| १ | पुणे ते अ. नगर | १)खराडी बायपास - हडपसर- सोलापुर रोड- केंडगाव चौफुला - न्हावरा-नगर<br>२) भैरोबानाला -हडपसर-सोलापूर रोड-केडगांव चौफुला-न्हावरा-नगर |
| २ | मुंबई ते अ.नगर | खेड-मंचर-नारायणगांव-आळेफाटा मार्गे अ.नगर कडे जावे |
| ३ | सातारा-अ.नगर | कापुरओव्हळ-सासवड-मोरगांव-केडगांव-चौफुला-न्हावरा-शिरुर मार्गे अ.नगर कडे जावे |

ड) पुणे शहरामध्ये दिनाक ३१.१२.२०२४ चे ००.०१ ते ०१.०१.२०२५ चे २४.०० वा दरम्यान सर्व प्रकारचे जड/अवजड वाहनांना (ट्रक, डंपर, मिक्सर, बल्कर, जे.सी.बी.रोड रोलर,मल्टी एक्सल वाहनांसाठी ) खालील ठिकाणाच्या पुढे प्रवेश बंदी करण्यात येत आहे.सर्व वाहन चालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करुन इच्छित स्थळी जावे.

१) थेऊर फाटा,लोणीकाळभोर पासुन पुढे  २) हॅरीष ब्रिज, खडकी, ३)बोपखेल फाटा,विश्रांतवाडी ४) राधा चौक,बाणेर, ५)नवले ब्रिज,वारजे , ६)कात्रज चौक,कात्रज, ७)खडीमशीन चौक, कोंढवा, ८) मंतरवाडी फाटा, फुरसुंगी , ९) मरकळ ब्रिज पासुन पुढे प्रवेश बंद राहील.

ई) तसेच संपुर्ण पुणे शहर पोलीस आयुक्तालया मध्ये दिंनाक ३१.१२.२०२४ चे ००.०१ ते ०१.०१.२०२५ चे २४.०० वा दरम्यान सर्व प्रकारचे जड/अवजड वाहनांना (ट्रक, डंपर, मिक्सर, बल्कर, जे.सी.बी.रोड रोलर,मल्टी एक्सल वाहनांसाठी ) अंतर्गत वाहतूकी करीता सर्व रोडवरती प्रवेश बंदी करण्यात येत आहे.(अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ. वगळून )

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, पुणे शहर

( अमोल झेंडे )
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक, पुणे शहर

प्रति,

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :-

१. **सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – १,२,३,४ पुणे शहर.**

२. **पोलीस निरिक्षक,** प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे

२/- सदर प्रेस नोटच्या प्रति पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्दकरण्याची विनंती करावी.

३. **प्रभारी अधिकारी, सर्व** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- सदरबाबत म.न.पा. पुणे यांचेकडून वरील प्रमाणेफलक बसवुन घेवुन ०७ दिवसांत पुर्तता अहवाल इकडील कार्यालयास सादर करावा.

४. **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी. सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी.

५. **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.

६.**मा. सहाय्यक अभियंता** (ट्रॅफिक प्लॅनिंग), म.न.पा. पुणे
२/-सदर ठिकाणीवरीलप्रमाणेफलक बसविणेबाबतची कार्यवाही होणेस विनंती आहे.